# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.08.2025** **वारःरविवार**

---

•किसान सम्मान निधी, शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रती सरकारच्या वचनबद्धतेचं द्योतक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन, विसाव्या हप्त्याचं वाटप

•जनतेला अभिप्रेत असलेल्या उत्तम प्रशासनाचा प्रत्यय लवकरच मिळेल-मुख्यमंत्र्यांचा विश्वास

•जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतील यशाबद्दल दिव्या देशमुखला तीन कोटी रुपयांचं बक्षीस आणि

•भारत-इंग्लंड पाचवी क्रिकेट कसोटी रंगतदार अवस्थेत

**<u>पंतप्रधान</u>**

**<u>इंट्रो</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसी इथून किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता वितरित केला. देशभरातील ९ कोटी ७० लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २० हजार ५०० कोटी रुपये थेट हस्तांतरित करण्यात आले. वाराणसीतल्या बावीसशे कोटी रुपयांच्या ५२ विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही पंतप्रधानांनी केलं. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी लहान जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशानं सरकारनं नवीन पीएम धनधान्य योजना सुरू केली असल्याचं सांगताना पंतप्रधान म्हणाले...

**<u>मोदी-बाईट-३५ सेकंद</u>**

जागतिक व्यापार युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी स्वदेशीच्या मुद्द्यावर पुन्हा भर दिला. ते म्हणाले...

**<u>मोदी-बाईट-२७ सेकंद</u>**

निधी वितरणाच्या पुण्यातील कार्यक्रमात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते. तर बुलढाणा इथल्या कृषी विज्ञान केंद्रात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सहभागी झाले होते.

**विमाने**

भारताला स्पेनकडून काल १६ एअरबस सी-२९५ लष्करी वाहतूक विमानं सोपवण्यात आली. स्पेनमधल्या सेव्हिल इथं भारतीय राजदूत दिनेश के. पटनायक आणि भारतीय वायु दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा हस्तांतरण सोहळा पार पडला. गुजरातमधल्या वडोदरा इथल्या कारखान्यात ही विमानं जुळवली जातील.

**प्रशासन**

राज्य स्तरावरच्या सर्व जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहा समित्यांनी केलेल्या शिफारसीनुसार; जनतेला अभिप्रेत असलेल्या उत्तम प्रशासनाचा प्रत्यय लवकरच मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते काल नागपूर इथं भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या परिषदेत बोलत होते. कोणतीही जिल्हा वार्षिक योजना रोजगाराचं साधन न ठरता यातून रोजगाराची मोठ्या प्रमाणात निर्मिती व्हावी, हे अभिप्रेत आहे. यासाठी आवश्यक सुधारणांचा अभ्यास करुन कोणत्या योजना स्वीकाराव्या आणि कोणत्या वगळाव्यात याची मांडणी या समित्यांनी केली असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**सरन्यायाधिश**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेल्या संविधानानं; सर्वांना समान संधी देणारी व्यवस्था देशात तयार केली, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या डॉ आंबेडकर महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात ते काल बोलत होते. या कार्यक्रमाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील उपस्थित होते. बाबासाहेबांनी दिलेला सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा संदेश आचरणात आणण्याची गरज असल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सांगितलं.

**सत्कार**

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतली विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुखचा शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्याद्वारे काल नागपूरमध्ये  नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिव्याला तीन कोटी रुपयांचं बक्षीस प्रदान करण्यात आलं. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेकडूनही ११ लाख रुपयांचं बक्षीस दिव्याला देण्यात आलं. खासदार क्रीडा महोत्सव समितीकडूनही तिचा सन्मान करण्यात आला.

**<u>कोल्हापुरी-चप्पल</u>**

**<u>इंट्रो</u>**

भारताच्या पारंपरिक हस्तकलेच्या नमुन्यांपैकी एक असलेली कोल्हापुरी चप्पल सध्या चर्चेत आहे. चप्पल बनवण्याच्या कित्येक पिढ्या चालत आलेल्या या कलेचं आकर्षण राज्यात तसंच देशात तर आहेच आणि आता परदेशातील बाजारातही ती ग्राहकांना आकर्षित करत आहे. या चपलेच्या प्रवासातील पावलांचा आढावा घेणारा हा वृत्तांत...

**<u>Script:</u>**

कोल्हापुरी चपलांचा इतिहास हा १२ व्या शतकातील संत परंपरेपासून ते २० व्या शतकातील राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगतिकारक धोरणांशी निगडित आहे. भारतातील अनेकानेक वैविध्यपूर्ण पारंपरिक हस्तकलांमध्येही, कोल्हापुरी चप्पल म्हणजे मानवी हातांचं कसब किती अनोखं असू शकतं याचं एक अस्सल उदाहरण आहे. तिला स्वतःची अशी एक खास सांस्कृतिक ओळख आहे.  आत्ताच्या फॅशन-जगतातलं त्यांचं पदार्पण नवीन असलं तरी त्यामागं पिढ्यानुपिढ्या जतन केलेलं परंपरागत ज्ञान, कौशल्य आणि वर्षानुवर्षांचे संस्थात्मक प्रयत्न यांचा शेकडो वर्षांचा इतिहास आहे. प्रामुख्यानं कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरमध्ये कोल्हापुरी चपलेचं उत्पादन होतं. या चपला बनवणाऱ्या कुटुंबांमध्ये पिढ्यानपिढ्या ती कला चालत आलेली आहे. नैसर्गिकरित्या कमावलेलं कातडं आणि वेणीसारखे गुंफलेले पट्टे वापरून बनवलं जाणारं हे चामड्याचं पादत्राण आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात कोल्हापूरचे द्रष्टे शासक छत्रपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापुरी चपलांच्या वापराला चालना द्यायचं ठरवलं आणि व्यवसाय म्हणून त्यांचा दर्जा उंचावला. ओबडधोबड गावठी पायताण बनवणारे बलुतेदार पाहता पाहता राजाश्रय असलेले कारागीर झाले आणि त्यांनी घडवलेली पादत्राणं स्वदेशी अस्मितेचं प्रतीक बनली. कोल्हापुरी चपलांची कारागिरीची मूळ परंपरा जतन केली जावी आणि नफेखोरीसाठी त्यांची बाजारातील इतर उत्पादकांनी नक्कल करू नये याची खबरदारी घेण्याच्या  दृष्टीने २०१९ मध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या चर्मोद्योग विकास महामंडळांनी एकत्रितपणे अर्ज करून भौगोलिक निर्देशांकाचं ओळखचिन्ह म्हणजे Geographical Index Tag मिळवला. या जागतिक अर्थव्यवस्थेतील कायदेशीर तरतुदीमुळे अस्सल कोल्हापुरी चपला बनवण्याचे सर्व हक्क आता महाराष्ट्र आणि

कर्नाटकमधील काही जिल्ह्यांसाठीच राखून ठेवले गेले आहेत. कोल्हापुरी चपला म्हणजे केवळ उपयुक्ततामूल्य असलेल्या वस्तू नसून त्यांच्यात स्वदेशाभिमान, स्वावलंबन आणि जिवापाड ज्यांचे रक्षण करावे अशा उज्ज्वल परंपरांच्या अनेक कथा दडलेल्या आहेत. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.

**इंट्रो**

अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या पुढाकारानं सुरू झालेल्या नाम फाउंडेशननं करगिल विजय दिनानिमित्त जम्मू-काश्मीरमध्ये एका संगणक प्रशिक्षण केंद्राचा नुकताच प्रारंभ केला. याविषयी आकाशवाणीशी बोलताना नाम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात म्हणाले......

**बाईट – ४५ सेकंद**

**पंकजा-मुंडे**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर रासायनिक सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यासाठी पाच टक्के अधिक निधी दिला जाईल, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी काल नाशिकमध्ये दिली. नाशिक शहरातील उद्योजकांच्या निमा आणि आयमा या संस्थांच्या वतीनं आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

**समरसता-संमेलन**

समरसतेवर आधारित जीवनमूल्यांशी बांधिलकी मानणारं, समाजनिष्ठ साहित्य निर्माण करणं ही काळाची गरज आहे असं मत ज्येष्ठ साहित्यिक नामदेवराव कांबळे यांनी काल नांदेडमध्ये व्यक्त केलं. विसाव्या समरसता साहित्य संमेलनात ते बोलत होते. दोन दिवसंचय या संमेलनाचा समारोप आज राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवाणा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे.

**निधन**

आकाशवाणीचे निवृत्त उद्घोषक मंगेश वाघमारे यांचं काल पुण्यात निधन झालं. ते ६५ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून ते यकृताच्या विकाराने आजारी होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. उत्कृष्ट संतूर वादक तसंच उत्तम निवेदक असलेले वाघमारे यांनी अनेक सांगितिक कार्यक्रमांत संवादक म्हणून जबाबदारी सांभाळली होती

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील ओव्हल इथला पाचवा आणि अंतिम सामना रंगतदार अवस्थेत पोहोचला आहे. आकाशदीपनंतर रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या अर्धशतकाच्या आणि यशस्वी जयस्वालच्या शतकी खेळीच्या जोरावर भारतानं दुसऱ्या डावात 396 धावा केल्या. विजयासाठी 374 धावांचं उद्दिष्ट गाठताना तिसऱ्या दिवसअखेर इंग्लडच्या 1 बाद 50 धावा झाल्या. सामन्याचे दोन दिवस बाकी आहेत.

**हवामान**

येत्या २४ तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर कोकणात बऱ्याच ठिकाणी पावसाच्या सरी पडण्याची शक्यता असून विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**